दिनांक :– १३.०८.२०२१

**<u>प्रेसनोट</u>**

**आरोपी लोकसेवक दिलीपकुमार विठ्ठलराव राठोड, वय–४३ वर्ष, वर्ग–२, प्राचार्य, महाकाली माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय हत्ता ता. सेनगाव जि. हिंगोली व हनुमान गोरखनाथ रवणे, वय – २३ वर्ष, (खाजगी इसम), रा.शिंदेफळ ता. सेनगाव जिल्हा हिंगोली यांना २०००/– रू. ची लाच स्विकारले प्रकरणी ताब्यात घेण्यात आले.**

---

पिडीत तक्रारदार यांनी दि.१२.०८.२०२१ रोजी तक्रार दिली होती की, तक्रारदार यांचे भाच्यांची जातपडताळणी प्रस्ताव महाकाली माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय हत्ता ता. सेनगाव जि. हिंगोली मार्फत प्रस्ताव पाठवुन भाच्यानी व मुलीनी जात पडताळणी कार्यालय हिंगोली येथुन त्यांच्या ओळखीने जात वैध्यता प्रमाणपत्र मिळवून देण्यासाठी म्हणून प्राचार्य श्री दिलीपकुमार विठ्ठलराव राठोड यांनी २०००/–रू. च्या लाचेची मागणी करीत असल्याबाबत अँ.क.ब्युरो हिंगोली कार्यालयात तक्रार दिली. त्यावरुन दि.१२.०८.२०२१ रोजी तक्रारदार यांचे तक्रारीची पडताळणी करण्यात आली. सदर तक्रार पडताळणीमध्ये लोकसेवक दिलीपकुमार विठ्ठलराव राठोड यांनी तक्रारदार यांचेकडे २०००/–रू. लाचेची मागणी करुन लाच स्विकारण्यास सहमती दिली.

त्यावरुन आज दि.१३.०८.२०२१ रोजी सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक दिलीपकुमार विठ्ठलराव राठोड, प्राचार्य, महाकाली माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय हत्ता ता. सेनगाव जि. हिंगोली, यांनी बस स्थानक सेनगाव जवळील माऊलीकृपा मेडीकल मध्ये लाचेची रक्कम २०००/–रू. अंदाजे १६.४५ वाजताच्या सुमारास ती रक्कम खाजगी इसम हनुमान गोरखनाथ रवणे, रा. शिंदेफळ ता. सेनगाव यांच्याकडे देण्याचे सांगितले त्यांनी ती रक्कम घेवुन स्वत: कडे ठेवुन लोकसेवक दिलीपकुमार विठ्ठलराव राठोड यांना लाच स्विकारण्यास मदत केली. म्हणुन लोकसेवक १) दिलीपकुमार विठ्ठलराव राठोड, वय–४३ वर्ष, वर्ग–२, प्राचार्य, महाकाली माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय हत्ता ता. सेनगाव जि. हिंगोली व खाजगी इसम २) हनुमान गोरखनाथ रवणे, रा. शिंदेफळ ता. सेनगाव यांना लाचेच्या रक्कमेसह पकडण्यात आले आहे. पुढील कारवाई सुरू आहे.

ही कामगिरी मा. श्रीमती कल्पना बारवकर, पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो नांदेड, मा. श्रीमती अर्चना पाटील, अपर पोलीस अधीक्षक अँन्टी करप्शन ब्युरो, नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली श्री निलेश सुरडकर, पोलीस उप अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली यांनी, पोहेकॉ श्री विजय उपरे, पोना श्री तान्हाजी मुंढे, पोना श्री ज्ञानेश्वर पंचलिंगे, पोशि श्री अवि किर्तनकार, चापोना श्री सरनाईक अँ.क.ब्युरो कार्यालय हिंगोली यांचे मदतीने यशस्वीपणे केलेली आहे.

अँन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्या वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील, तर कृपया अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालयाशी संपर्क साधावा. कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी अँन्टी करप्शन ब्युरोचे कार्यप्रणाली बाबत वा तक्रारी बाबत माहिती पाहिजे असल्यास खालील मोबाईल व दुरध्वनीवर संपर्क साधावा. तसेच तक्रारदार यांना तक्रार देण्यासाठी अँन्टी करप्शन ब्युरो मार्फत मोबाईल अँप www.acbmaharashtra.net हे सुरू करण्यात आले आहे.

**टोल फ्री क्र.१०६४**, दुरध्वनी क्र.०२४५६–२२३०५५,

मोबाईल क्रमांक :– ९८२२२००९५९